www.research-Chronicler.com

e-ISSN - 2347-503X
p-ISSN - 2347-5021

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya, Aundh, Pune-67



# Research Chronicler

## International Multidisciplinary Research Journal

Vol. VI Spl. Issue IV November 2018

: Executive Editor :
Dr. Manjushri Bobade

: Editor-In-Chief :
Dr. Sanjay Nagarkar

| | | | |
|---|---|---|---|
| 34 | प्रा. डॉ. जी. पी. बोडखे | पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील: बहुआयामी व्यक्तित्व | 131 |
| 35 | जीवप्रसाद उदय माजगांवकर | महाराष्ट्राच्या सामाजिक व मानसिक जडण घडणीत रयत शिक्षण संस्थेचे योगदान | 134 |
| 36 | डॉ. पोपट सिनारे | पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांचे शैक्षणिक कार्य | 136 |
| 37 | श्री. सुरेश विठ्ठल मेहेर | कर्मवीर भाऊराव पाटील यांचे शैक्षणिक कार्य- | 138 |
| 38 | अमोल रवींद्र बागड | रयत शिक्षण संस्था विकास आणि वाटचाल | 141 |
| 39 | प्रा. डॉ. प्रकाश सूर्यवंशी | कर्मवीर भाऊराव पाटील यांचे शैक्षणिक विचार: एक दृष्टिक्षेप | 143 |
| 40 | प्रा. विजयश्री गवळी | पद्मभूषण कर्मवीर भाऊराव पाटील यांचे शैक्षणिक कार्य | 146 |
| 41 | प्रा. जाधव सावित्री दत्तात्रय | कर्मवीर भाऊराव पाटील यांचे क्षेत्रातील योगदान | 149 |
| 42 | विलास विठ्ठल नाबदे | महाराष्ट्राच्या राजकीय विकासात रयत शिक्षण संस्थेचे योगदान | 151 |
| 43 | प्रकाश रणसिंग | महाराष्ट्रातील भाषिक विविधता: रयत शिक्षण संस्थेसमोरील आव्हान | 154 |
| 44 | किरण गणपत कुंभार | कर्मवीर भाऊराव पाटील आणि ग्रामीण शिक्षण | 157 |
| 45 | प्रा. डॉ. सुनील लक्ष्मण परदेशी | कर्मवीर भाऊराव पाटील: एक समाज सुधारक | 160 |
| 46 | प्रा. डॉ. अतुल चौरे व प्रा. चिंतामण धिंदळे | शैक्षणिक क्षेत्रातील महामेरू: पद्मभूषण कर्मवीर भाऊराव पाटील | 162 |


288

University Grants Commission, New Delhi Recognized Journal No. 41311
ISSN: Print: 2347-5021 www.research-chronicler.com ISSN: Online: 2347-503X

आश्रय दिला. त्यामुळे छत्रपती शाहूमहाराजांच्या स्वभावातील चांगले पैलू पाहिला मिळाले. त्याच बरोबर महाराजांना भाऊरावांचा निर्व्यसनी स्वभाव, सत्य बोलण्याची सवय, वेळेवर व्यायाम करण्याची सवय या बद्दल आपुलकी वाटली सहावी इंग्रजीच्या वर्गात भाऊराव नापास झाले. तेव्हा त्यांनी वर्ग शिक्षक बि.के. कुलकर्णी यांना वरच्या वर्गात घालण्याची विनंती केली. पण त्यांनी त्यास नकार दिल्याने, भाऊरावांनी शाळेला कायमचा रामराम ठोकला.

भाऊराव अठरा वर्षांचे असताना, त्यांचे लग्न बारा वर्षाच्या सौ. लक्ष्मीबाई यांच्याशी झाले. लक्ष्मीबाई घरकाम आणि स्वयंपाकात हुशार होत्या. त्यांचा स्वभाव नम्र होता. थोरा मोठ्यांची कामे करण्यात त्या निपुण होत्या. त्या काळात लक्ष्मीबाई घरकामा बरोबर शेतीची कामे करीत होत्या. भाऊराव सांगली या ठिकाणी इंग्रजी शिक्षणासाठी गेले. तेव्हा एका आडावर एक अस्पृश्य स्त्री पाणी मिळावे म्हणून विनवणी करीत होती. पण कोणी पाणी देत नव्हते. तेव्हा भाऊरावांनी रागाने राहट आडात ढकलून दिला. तेव्हा भाऊरावांचे आई-वडील म्हणालेकी, आमच्या भाऊला अस्पृश्यां बद्दल फार कणव आहे. या वरून असे दिसते की, लहान पणा पासूनच भाऊरावांना समाजातील विषमतेविरुध्द चीड होती. एकदा वडिलांना भेटण्यासाठी इस्लामपूरला जाताना भाऊरावांना एक मुलगा वर्गाबाहेर बसलेला दिसला. तेव्हा भाऊरावांनी गुरुजींना त्याला वर्गात घ्यायला सांगितले. पण गुरुजींनी त्याला वर्गात घेतले नाही. म्हणून भाऊराव त्याला (ज्ञानदेव ध्रुवनाथ घोलप) याला घरी घेऊन आले. व कोल्हापूरच्या मिस क्लार्क होस्टेलमध्ये प्रवेश मिळवून दिला. पुढे ज्ञानदेवने चांगला अभ्यास केला. मॅट्रिकची परीक्षा पास झाला. आणि मूकनायक पाक्षिक संपादक झाला. पुढे मुंबई कायदे मंडळाचा सरकारनियुक्त सभासद (१९२३) झाला. यामधून कर्मवीर अण्णांची दूरदृष्टी दिसून येते.शाळेमधून घरी राहिल्यानंतर भाऊराव व्यापारी शिक्षण घेण्यासाठी मुंबईला गेले. पण त्यांचे मन त्या व्यवसायात रमले नाही. म्हणून त्यांनी सातारा शहरात भाड्याने जागा घेऊन शिकवण्या करण्याचे कार्य केले. पोप नावाच्या एका युरोपियन डेप्युटी कलेक्टरला मराठी शिकवण्याची पहिली शिकवणी मिळाली. तसेच पेठे नावाच्या असिस्टंट कलेक्टरच्या मुलाला संस्कृत शिकवण्याचेही कार्य त्यांनी केले. तासनतास ते शिकविण्याचे कार्य करीत असल्यामुळे साताऱ्यात पाटील मास्तर या नावाने ते प्रसिध्द झाले. सन १९१४ रोजी ताराबाई पार्क नावाच्या बागेतील एडवर्ड बादशहाच्या अर्धपुतळ्याला कोणीतरी डांबर फासले. त्यावेळेस अण्णासाहेब लठ्ठे यांच्या विरोधात भाऊराव पाटलांनी साक्ष द्यावी म्हणून त्यांना बोलाविले. त्यासाठी भाऊरावांना पैसे आणि जमीन देण्याचे आमिष देण्यात आले. तेव्हा भाऊरावांनी खोटी साक्ष देण्यास नकार दिला. त्यामुळे निटवे नावाच्या ग्रहस्थाने भाऊरावांना घराला आग लावण्याच्या आणि घरातील पैसे चोरी करण्याचा आरोप करून जेलमध्ये टाकले. परंतु भाऊरावांनी अखेरपर्यंत खोटी साक्ष देण्यास नकार दिला. महात्मा गांधीजींच्या सत्याचे मूल्य जोपासणाऱ्या कर्मवीर भाऊराव पाटील हे आजच्या तरुणांसाठी आदर्शवत आहेत. कर्मवीर भाऊराव पाटील हे सत्यशोधक विचाराचे असल्यामुळे देवपूजा करीत नसत. जनसेवा हीच परमेश्वर पूजा मानीत. मात्र लक्ष्मीबाई जैन धर्माचे रीतीरिवाज पाळीत असत. घरातील सर्व कामे स्वतः करीत. त्यांचे बोलणे नम्र स्वरूपाचे होते. कोणालाही न दुखावता सर्वांची कामे करीत असत. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्यावर महात्मा जोतिराव फुले आणि राजर्षि छत्रपती शाहू महाराजांच्या विचारांचा पगडा होता. सत्यशोधक परिषदेमध्ये आपले विचार मांडताना भाऊराव म्हणाले की, "आपण सर्वजण सत्यशोधक समाजाचे कार्यकर्ते गावोगाव सभा भरवून व जलशांच्या माध्यमातून सत्यशोधक समाजाचे विचार मांडतो. परंतु हे सर्व अडाणी खेडुत विचार ऐकतात व माना डोलावतात. परंतु नवीन विचाराप्रमाणे वागत नाहीत. तेव्हा आपले प्रयत्न व कष्ट वाया जातात. तरुण पिढीला शिक्षण दिल्याशिवाय याचा परिणामकारक तोडगा मला दिसत नाही. म्हणून बहुजन समाजातील मुला-मुलींना शिक्षण देण्यासाठी आपण शिक्षण संस्था स्थापन करणे जरूर आहे."१ म्हणून कर्मवीर अण्णांनी ४ ऑक्टोबर १९१९ रोजी काले जिल्हा सातारा. या



289

कर्मवीर भाऊराव पाटील हे आधुनिक युगातील महामेरू आहेत. त्यांच्या कार्याचा गौरव करताना महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण म्हणाले होते की, "छत्रपती शिवाजी महाराज जाऊन तीनशे वर्षे लोटली. पण काळ त्यांना विसरला नाही. महात्मा फुले जाऊन सत्तर-ऐंशी वर्षे झाली. पण आपण त्यांना विसरलो नाही. लोकमान्य टिळक, महात्मा गांधी यांना आपण विसरू शकत नाही. संत तुकारामांचे अभंग तीनशे वर्षानंतरही अभंगच राहिले. कर्मवीर आण्णा हे याच मालिकेतील होत."[५] यावरून आपणास पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या शैक्षणिक आणि सामाजिक कार्याची ओळख होते.

**संदर्भ ग्रंथ:**

०१) काटकर मा.भि. "नव्या पिढ्यांचा निर्माता कर्मवीर भाऊराव पाटील", अमेय प्रकाशन, पुणे. पृ.क्र. २४.
०२) तत्रैव. पृ.क्र. २८.
०३) तत्रैव. पृ.क्र. ३७.
०४) तत्रैव. पृ.क्र. ८२.
०५) तत्रैव. पृ.क्र. ८७.

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya Aundh, Pune-67

290